| 2025 | II | 20 | 1500 | J-307 | (M) |
|---|---|---|---|---|---|

# POLITICAL SCIENCE (42)

**Time : 3 Hrs.** **(7 Pages)** **Max. Marks : 80**

**सूचना :** *(१) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.*

*(२) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.*

*(३) प्रश्न क्रमांक २ (अ) मधील संकल्पना चित्रे त्याच नमुना आराखड्यानुसार उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.*

*(४) प्रत्येक नव्या प्रश्नाच्या उत्तराचा प्रारंभ नवीन पानावर करावा.*

**प्र. १.** **(अ)** कंसांतील योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा : (५)**[२०]**

(१) जागतिक व्यापार संघटनेची (WTO) स्थापना ----- या वर्षी झाली.

(१९७५, १९८५, १९९५, २००५)

(२) १९६० च्या दशकात भारतात कृषीक्षेत्रात ----- क्रांती झाली.

(श्वेत, निल, हरित, औद्योगिक )

(३) राष्ट्रवाद ही ----- अस्मिता निर्माण होण्याची भावना आहे.

(आर्थिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय )

(४) लोकपाल ही संकल्पना ----- या देशाकडून घेण्यात आली.

(अमेरिका, स्वीडन, इंग्लंड, कॅनडा )

(५) सन १९७२ साली भारत आणि पाकिस्तान यांच्यात ----- करार झाला.

(लाहोर, शिमला, ताश्कंद, पंचशील )

(ब) खालीलपैकी प्रत्येक गटांतील चुकीची जोडी ओळखा व दुरुस्त करून पुन्हा लिहा : (३)

(१) (अ) पंडित जवाहरलाल नेहरू — Discovery of India

(ब) तामिळ लोकांच्या हक्कासाठी लढा — SAARC

(क) अमेरिका — Melting Pot

(२) (अ) महाराष्ट्र लोकायुक्त संस्था — १९७२

(ब) माहितीच्या अधिकाराचा कायदा — २००८

(क) ग्राहक संरक्षण कायदा — १९८६

(३) (अ) NATO — युरोप

(ब) CENTO — पश्चिम आशिया

(क) SEATO — आफ्रिका

**(क)** दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा : (४)

(१) मास्त्रीक्त करार संदर्भ.......

(अ) युरोपियन संघ

(ब) ब्रिक्सची स्थापना

(क) सार्क संघटना

(२) साम्यवादी बाजारपेठीय अर्थव्यवस्था ही संकल्पना या देशाच्या संदर्भात वापरली जाते .....

(अ) भारत

(ब) चीन

(क) अमेरिका

(३) आज भारताचा लिंगभाव निगडित दृष्टिकोन यावर लक्ष केंद्रित करतो ....

(अ) शिक्षण

(ब) महिला सक्षमीकरण

(क) विकास

(४) चारू मुजुमदार यांच्याशी निगडित आहेत ......

(अ) नक्षलवादी चळवळ

(ब) हिज्बूल मुजाहिद्दीन

(क) आसाम तेलकोंडी

**(ड)** दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना लिहा : (४)

(१) भारत सरकारचा विचारगट म्हणून कार्य करणारा व सरकारला दिशादर्शक आणि धोरणात्मक सल्ले देणारा आयोग......

(२) समाजात भीती/धास्ती निर्माण करण्यासाठी हिंसाचाराचा केलेला वापर......

(३) लोकांचा राज्याच्या निर्णय प्रक्रियेतील सहभाग......

(४) दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व सोव्हिएट रशिया यांच्यातील संघर्ष.......

**(इ)** गटात न बसणारा शब्द ओळखा व लिहा : (४)

(१) बीम्सटेकचे सदस्य – भारत, भूतान, नेपाळ, अमेरिका.


(२) फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हाटस्‌ॲप, इंटरनेट.



(३) हवामान बदल, प्रदूषण, जंगलतोड, गरिबी.

(४) कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ, महामंडळ.

**प्र. २. (अ)** खालील संकल्पना चित्र पूर्ण करा : (४) [१]




**(ब)** खालील नकाशाचे निरीक्षण करून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा : (५)




सोव्हिएट रशियामधील पूर्वीचे देश

(१) सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर उदयास आलेल्या कोणत्याही पाच देशांची नावे लिहा.

**प्र. ३. खालील विधाने 'बरोबर' की 'चूक' ते सकारण लिहा (कोणतेही पाच) :** **[१०]**

(१) जागतिकीकरणात बिगर राजकीय घटकांचे महत्त्व कमी झाले आहे.

(२) बहुराष्ट्रीय कंपन्यांचे मुख्यालय कोणत्याही एका राष्ट्रात नसते.

(३) राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना महिला हक्क संरक्षणासाठी करण्यात आली.

(४) संयुक्त राष्ट्रांचे स्त्रियांसाठीचे दशक सन १९८६ मध्ये सुरू झाले.

(५) भारतीय स्वातंत्र्य चळवळ राष्ट्रीय एकात्मतेस पोषक ठरली.

(६) १९८० च्या दशकाला मानवतावादी हस्तक्षेपाचा सुवर्णकाळ म्हणतात.

(७) सुशासनामध्ये नैसर्गिक संसाधनांचा कुशलतेने वापर केला जातो.

**प्र. ४. खालील विधानांचा सहसंबंध स्पष्ट करा (कोणतेही तीन) :** **[९]**

(१) शीतयुद्धाचा शेवट – नव्या राष्ट्रांचा उदय

(२) जागतिकीकरण - संस्कृती

(३) गरिबी - विकास

(४) जम्मू काश्मीर - सीमापार दहशतवाद

(५) भारत - अलिप्ततावाद

**प्र. ५. खालील विषयावर तुमचे मत २५ ते ३० शब्दांत मांडा ( कोणतेही तीन ) :** **[१२]**

(१) तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील प्रगतीचा मानवी जीवनावर परिणाम झाला आहे.



(२) पर्यावरण संरक्षण काळाची गरज आहे.

(३) दहशतवाद ही जागतिक समस्या आहे.

(४) ई-प्रशासनाने शासनाला जनतेच्या जवळ आणले आहे.

(५) भारत ही उगवती सत्ता आहे.

**प्र. ६. खालील प्रश्नांची उत्तरे ८० ते १०० शब्दांत लिहा ( कोणतेही दोन ) :** **[१०]**

(१) युरोपियन महासंघाचे कार्य कसे चालते?

(२) जागतिकीकरणाचे राजकीय क्षेत्रावर झालेले परिणाम स्पष्ट करा.

(३) भारतातील महिलांपुढील समस्या स्पष्ट करा.

(४) राष्ट्रीय एकात्मता साध्य करण्यासाठीची राज्याची भूमिका स्पष्ट करा.

**प्र. ७. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सुमारे १५० ते २०० शब्दांत स्पष्ट लिहा :** **[१०]**

(i) सुशासनाची खालील दिलेली मूल्ये स्पष्ट करा -

(१) सहभागात्मक

(२) पारदर्शकता

(३) कायद्याचे राज्य

(४) सहमतीदर्शक

(५) उत्तरदायित्व

(ii) भारताच्या परराष्ट्र धोरणाला प्रभावित करणारे घटक स्पष्ट करा -

(१) भौगोलिक घटक



(२) ऐतिहासिक घटक

(३) आर्थिक घटक

(४) राजकीय घटक

(५) आंतरराष्ट्रीय व्यवस्था